**कर्मचारी नुकसान भरपाई आयुक्त तथा न्यायाधीश, कामगार न्यायालय, जालना यांचे न्यायालयात**
**( मा. श्री. श. ज्ञा. बाऊचकर यांचे समोर )**

**अर्ज (का.नु.भ.) क्र.०८/२०२४**
CNR NO. MHLC21-000128-2024

अनिता काकासाहेब जाधव व इतर ...अर्जदार

विरूध्द

अंकुश जगन्नाथ खलाटे व इतर ...वि.प.

**निशाणी क्र. सी–६ खाली आदेश**

१. प्रस्तुतचा अर्ज वि.प.क्र.१ ने त्यांच्या विरूध्द प्रकरण एकतर्फा चालण्याचा झालेला आदेश रद्द करून कैफियत दाखल करून घेण्यासाठी दिलेला आहे. वि.प. ने असे नमूद केलेले आहे की, तो पुणे जिल्हयातील रहिवाशी असून त्याच्या वैयक्तिक अडचणींमुळे तो न्यायालयात हजर राहू शकला नाही, त्यामुळे त्याच्याविरूध्द करण्यात आलेले आदेश नैसर्गिक न्यायाच्या कारणास्तव रद्द करून त्याला बाजू मांडण्याची संधी मिळावी.

२. प्रस्तुत अर्जाला अर्जदाराने म्हणणे द्यावे, असा आदेश केला असता, अर्जदारातर्फे विधीज्ञ श्री शिंदे यांनी असे म्हणणे नमूद केले आहे की, प्रस्तुत प्रकरणात वि.प.क्र. १ यांनी मुद्दामहून टाळाटाळ करून प्रकरण लांबविल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे सदरचा अर्ज नामंजुर करण्यात यावा.

३. वि.प. तर्फे विधीज्ञ श्री. एस.जी. गवळी आणि अर्जदारातर्फे विधीज्ञ श्री शिंदे यांचा युक्तीवाद ऐकला.

४. अर्जाच्या निर्णयासाठी माझेसमोर खालीलप्रमाणे मुद्दे उपस्थित होतात. या मुद्यांवरील निष्कर्ष कारणमीमांसेसहित मी पुढे नमूद करीत आहे.

| अ.क्र. | मुद्दा | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | वि.प.क्र.१ ने मागणी केल्याप्रमाणे त्याच्या विरूध्दचा एकतर्फा चा आदेश रद्द करून त्यांची कैफियत अभिलेख्यावर घेणे उचित होईल का ? | 'होकारार्थी' |
| २ | काय आदेश ? | अर्ज मंजुर |

**कारणमीमांसा**

५. प्रस्तुत प्रकरणात वि.प.ना नोटीस लागू होवूनही वि. प. हजर न झाल्याने दि. २३/०८/२०२४ रोजी नि.क्र. यु-१ वर प्रकरण दोन्ही वि.प. विरूध्द एकतर्फा चालवावे म्हणून आदेश पारीत करण्यात आला. त्यानंतर वि.प. क्र. २ विमा कंपनीने प्रकरणात हजर होवून त्यांच्यापुरता सदरचा आदेश रद्द व्हावा, म्हणून मागणी केली असता त्याप्रमाणे आदेश रद्द होवून वि.प. विमा कंपनीला प्रकरणात बाजू मांडण्याची संधी देण्यात आली, आणि त्यांची कैफियत दाखल करून घेण्यात आली. त्यानंतर प्रकरणात मुद्दे काढण्यात आले असून प्रकरण अर्जदाराच्या पुराव्याला आहे. अर्जदाराच्या विधीज्ञांनी वेळोवेळी प्रकरणात तडजोड होणार असल्याचे नमूद करून पुराव्याकरीता मुदत मागणी केलेली आहे. सदरचे प्रकरण दि. १३/०९/२०२५ च्या -

लोक–न्यायालयातदेखील ठेवण्यात आले होते. त्यानंतर नेमण्यात आलेल्या तारखांनादेखील अर्जदाराच्या विधीज्ञांनी प्रकरणात तडजोड होणार आहे, असे नमूद केलेले आहे. आजरोजी देखील प्रकरण दि. १३/१२/२०२५ च्या लोक–न्यायालयात ठेवण्यात यावे, असे नमूद केलेले आहे. सबब सदरची वस्तुस्थिती विचारात घेता, जरी वि.प. प्रकरणात नोटीस मिळून देखील हजर राहिलेला नाही, ही वस्तुस्थिती असली तरी, प्रकरणाचा गुण–दोषावर निर्णय होणेसाठी वि.प. ला बाजू मांडण्याची संधी देणे उचित होईल. वि. प. ने अर्जामध्ये तो पुणे येथे राहत असल्याचे देखील नमूद केलेले आहे. सदरची बाब देखील विचारात घेण्याजोगी आहे. सबब मुद्दा क्र. १ चा निष्कर्ष 'होकारार्थी' नोंदवून मुद्दा क्र. २ च्या अनुषंगाने पुढीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## <u>आदेश</u>

१. वि.प. चा निशाणी क्र. सी–५ वरील अर्ज मंजुर

२. दि. २३/०८/२०२४ रोजीचा प्रकरण वि.प.क्र.१ च्या विरूध्द एकतर्फा चालविण्याचा आदेश रद्द करण्यात आला.

३. वि.प. क्र.१ ने प्रस्तुत अर्जासोबत दाखल केलेल्या कैफियतीला निशाणी क्रमांक देण्यात येवून अभिलेखावर घेण्यात आली.

*सही/–*

(श.ज्ञा.बाऊचकर)
कर्मचारी नुकसान भरपाई आयुक्त
तथा न्यायाधीश,
कामगार न्यायालय, जालना

जालना
दि. १२/१२/२०२५